# जंगलतोड

आम्ही या जंगलचे राजे, इथं रोज उपाशी मरतो
पुंजीपती या देशामधले, तिजोरी आपुली भरतो
जंगल तोडून... जंगल तोडून...॥धृ॥

इथे चालतो नित्य पहा पैशाचा खेळ
चोराने रखवालदाराशी जमविलासे मेळ
संगनमताने दोघांच्या साधुनिया वेळ
धन्याच्या हाती साल, हे खाऊन बसती केळ
हा गरीब मोळीवाला मग पात्र गुन्ह्याला ठरतो ॥१॥

नित्य पहातो आम्ही, सरकारी घुसखोरीला
दिवसा ढवळ्या डोळ्यांपुढे जंगल जाते चोरीला
व्यापारी अधिकारी यांच्या हरामखोरीला
बळी देतात मात्र आदिवासी नर नारीला
सोडून देती हत्ती, अधिकारी शेपूट धरतो ॥२॥

खाकी कपडेवाले आज खरीदतात पॉलीस्टर
उडवितात फटफव्या, वाजवीतात ट्रांझीस्टर
भोके पाडून कायद्याला, चरतात काँट्र्याक्टर
वननिकास आम्ही करतो, सांगतात मिनिस्टर
राष्ट्राची संपत्ती आम्ही रक्षण तिचे करतो ॥३॥

राजरोस चोरव्या मालाची लॉरी जाते भरून
चौकशा कसून करती गाड्यामध्ये फिरून
लाकूड नागरासाठी आणलेले टाकती जप्त करून
चोर चोर ठोकती बोंबा, जोरात बेंबीला धरून
खावून, पिवून, घेवून, उलटा त्यावर फिरतो ॥४॥